IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म-१)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** डायघर **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0379 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/10/2019 15:49 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार
   **Date From (दिनांक पासून):** 14/09/2019
   **Time Period (कालावधी):**
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/09/2019
   **Time From (वेळेपासून):** 11:00 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 23:00 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/10/2019 **Time (वेळ):** 15:39 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 032 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/10/2019 15:39 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्तळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** कल्याणफाटा,ठाणे

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** संजय शंकर म्हसे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

**(c) Date/Year of Birth (जन्म** 1970 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | श्रीरामचैक, टेपआळी, नेरळ ,डायघर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | श्रीरामचैक, टेपआळी, नेरळ ,डायघर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अगंद मुरलीधर मुंढे | | | 1. शवाशा उप शाखा मुंब्रा,डायघर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

फिर्याद दिनांक 09/10/2019मी, संजय शंकर म्हसे, वयः- 49 वर्षे धंदाः-दुध विक्री, रा. घर नं.196/3, श्रीरामचैक, टेपआळी, नेरळ ता.कर्जत जि.रायगड मो.नं.902857159 समक्ष हजर राहून फिर्याद लिहून देतो की,मी, वरीलप्रमाणे असुन नमुद पत्त्यावर जन्मापासुन रहाणेस आहे. माझे सोबत पत्नी व माझा मुलगा नामे कु.तनव असे राहण्यास आहे. मी, नेरळ येथे मालक श्रीमती अंजली पिसाळ यांचेकडून एक वर्षाचा करारनामा करुन, भाडयाने घेतलेल्या दुकानात माझी श्रीकृष्ण दुग्धालय या नावाने एजन्सी असुन मी नेरुळ, नवी मुंबई येथुन वारणा दुधाच्या पकींग असलेल्या पिशव्या असे एकूण 400-500 लीटर दूध मी घेवून येत असतो. सदरचे दूध माझा मुलगा नामे कु.तनव म्हसे यांचे नावे असलेला मारुती सुझुकी सुपर करी टेम्पोमधून ने-आण करीत असतो. मला ड्रायव्हींग येत नसल्याने, मी वर नमूद टेम्पो दररोज रात्री नेरळ येथून 21.30 ते 22.00 वा. निघून, नेरुळ, नवी मुंबई येथील वारणा डेअरी येथे बदलापूर- शिळफाटामार्गे वेगवेगळे ड्रायव्हर घेवून दूधाचा व्यवसाय करीत असतो. माझा वर नमूद टेम्पो डायघर, ट्राफीक पोलीस चैकी येथील पोलीस मुंढे यांनी ताब्यात घेतला असुन तो टेम्पो सोडण्यासाठी कोणतीही कायदेशीर पावती न देता रुपये 10,000/-ची मागणी करीत असल्याबाबत दिनांक 11/09/2019 रोजी तक्रार दिलेली आहे. तसेच गणपती असल्याकारणाने, मी दिनांक 13/09/2019 रोजी येणार असल्याबाबत सांगितले.त्यानंतर पोनिरी.श्रीमती पाटील यांनी सामान्य प्रशासन विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे येथील दोन शासकीय पंचाना पाचारण करून, दि.13/09/2019 रोजी सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करून मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकरीता मला डायघर, ट्रफिक पोलीस चैकी येथे पोलीस मुंढे यांची भेट घेवुन लाचेच्या रकमेबाबत बोलणी करण्यासाठी पंच श्री.दाते यांचेसोबत पाठविले. त्याप्रमाणे आम्ही दोघे रिक्षाने कल्याणफाटा येथील ट्राफीक चैकीत तसेच रोडवर मुंढे साहेब दिसतात काय? हे पाहिले असता, ते दिसून आले नाही म्हणुन आम्ही परत आलो. त्यावेळी पो.नि.श्रीमती पाटील यांनी पर्यवेक्षक पो.नि.श्री.मते व दोन्ही पंचांची तसेच माझ्याशी विचारविनिमय करुन पोलीस मुंढे हे मुंब्रा ट्राफीक कार्यालयात आहेत का? याची खात्री करण्याकरीता पुन्हा मला व पंच क्र. 1 यांचेसह मुंब्रा ट्राफीक कार्यालयात पाठविले असता, मुंढे हे अनंत चर्तुदशी गणपती विसर्जन बंदोबस्त असल्याकारणाने, आले नसल्याचे व उद्या येणार असल्याचे समजले. त्यावेळी दिलेल्या सूचनेप्रमाणे पुन्हा शासकीय वाहनाजवळ परत आलो. त्यानंतर पो.नि.श्रीमती पाटील व पर्यवेक्षक पो.नि.श्री.मते, पंचाशी तसेच माझेशी विचारविनियम करुन दिनांक 14/09/2019 रोजी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. नंतर मला दिनांक 14/09/2019 रोजी 11-00 वा. मुंब्रा बायपास ब्रिज येथे हजर राहणेबाबत सांगितले.त्याप्रमाणे दिनांक 14/09/2019 रोजी मी ठरलेल्या ठिकाणी हजर झालो, तेथे नव्याने हजर असलेले पंच श्री.गडमिदी यांचेशी माझी ओळख करुन दिली. त्यानंतर मला पंचासह पडताळणी करीता पोलीस कर्मचारी मुंढे यांना भेटण्यास पाठविले असता पडताळणी कारवाईत पोलीस मुंढे यांनी दारु पिलाय ड्रायव्हर आता काय? एक काम करु शकतो, पैसे भरा.. त्याचे लायसन्स जमा करा ओरीजनल.. बर का. मी, गाडी रिलीज करु शकतो, एवढी तुम्हाला मदत करु शकतो... कोर्टामधी जायचं न, कोर्टामधला फाईन



Scanned by CamScanner

त्याला भरायला लागेल, तीन हजार रुपये असे बोलले असता मी मग आता इथे काय? असे विचारले असता, इथे दहा हजार भरुन आता गाडी रिलीज करुन देतो.. इथे दहा हजार भरावे लागेल, केस कधीच केलीय की त्याला.. दहा हजार आता भरा गाडी सोडून देतो, त्याला मंगळवारी कोर्टमिधी पाठवा, तीन हजार रुपये फाईन लागेल, लायसन्स वगैरे काय सस्पेन्ड होणार नाही.. क्लिअर करुन देतो.. नाय तर गाडीची पासींग नाय होणार, उद्याच्याला.. असे बोलले. परंतु पोलीस मुंढे यांचेशी समक्ष भेटीत झालेल्या संभाषणात सदर लाचेची रक्कम आहे किंवा कसे? याबाबत खात्री करणेकरीता पुन्हा पडताळणी करण्याचा निर्णय घेवून मला पुन्हा पोलीस मंुढे यांचेशी बोलणी करण्याकरीता डिजीटल व्हाईस रेकर्डर लावून पंच श्री.दाते यांचेसह पाठविले असता पोलीस मुंढे यांची भेट घेवून मी त्यांना सांगीतले की, मुलगा येतो, ड्रायव्हरपण येतोय.. केस केली आहे का? मग काय आता तुम्ही पावती देणार... असे बोललो असता, मुंढे यांनी पावती नाय, कोर्टमिधी ड्रायव्हरला यावं लागेल, कोर्टात त्याला तीन हजार रुपये भरावे लागेल, ड्रायव्हरला तुमच्या, एवढ आहे की, मी त्याच लायसन्स सस्पेंड करत नाय, त्या पैशामधी त्याच लायसन्स वाचवून त्याला लायसन्स मिळवून देतो, एवढ करु शकतो, त्याला मंगळवारी कोर्टमिधी पाठवुन द्या असे बोलले. एकंदरीत पोलीस मुंढे यांनी माझे ड्रायव्हर श्री. शेळके याचेवर केस केली आहे असे सांगुन गाडी सोडण्याकरीता दहा हजार दिलेतर गाडी इथेच सोडतो असे बोलुन तक्रारदार यांचा अनाधिकारे ताब्यात घेतलेला टेम्पो परत देण्याकरीता तक्रारदार यांचेकडे 10,000/-रू. (दहा हजार) लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंढे यांनी माझे ड्रायव्हरला मंगळवारी कोर्टात येण्यास सांगीतले असल्याने त्यावेळी लागलीच लाचेची रक्कम घेवुन मला मुंढे यांचेकडे पाठविल्यास त्यांना संशय येण्याची शक्यता असल्याने पोनिरी पाटील, पर्यवेक्षक पो.नि.श्री.मते, दोन्ही पंच तसेच माझेशी विचारविनीमय करून पुढील सापळा कारवाई मंगळवार दिनांक 17/09/2019 रोजी करण्याचा सर्वानुमते निर्णय घेतला. त्यानंतर दिनांक 17/09/2019 रोजी सापळ्याचे डायघर ट्राफीक पोलीस चैकी येथे आयोजन केले असता, सदर दिवशी पोलीस मुंढे कर्तव्यावर आले नसल्याचे आढळून आले. त्यामुळे दिनांक 18/09/2019 सापळ्याचे आयोजन केले असता पोलीस मुंढे हे तीन-चार दिवस रजेवर असल्याचे तेथील पोलीस कर्मचारी यांनी तक्रारदार यांना सांगीतले. त्यामुळे पोलीस मुंढे कर्तव्यावर हजर झाल्यानंतर पुढील सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले होते पोलीस मुंडे हे कर्तव्यावर हजर झाले अगर कसे? हे पाहण्याकरीता मी, दिनांक 21/09/2019 रोजी माझे मोबाईल फोनवरुन पोलीस कर्मचारी मुंढे यांचे मोबाईल नंबर 9594134747 वर संपर्क केला असता, पोलीस मुंढे यांनी मला सोमवारी दिनांक 23/09/2019 रोजी भेटण्यास बोलाविले. त्याप्रमाणे मी, पोनिरी पाटील यांना कळविल्याने दि.23/09/2019 रोजी सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आले. परंतु सदर दिवशी पोलीस मुंढे हे कर्तव्यावर हजर नसल्याने दिनांक 26/09/2019 रोजी सापळा कारवाई आयोजित करण्यात आली. दि. 26/09/2019 रोजी माझेकडे डिजीटल व्हाईस रेकर्डर देवुन पंच साक्षीदारसह मुंब्रा येथील ट्राफीक पोलीस कार्यालयात पाठविले असता पोलीस मुंढे यांची ठाणे येथे बदली झाली असल्याचे समजले. पोलीस मुंढे यांची सदर ठिकाणाहुन बदली झाल्याने ते माझेकडे लाचेची मागणी करतील याची शक्यता वाटत नसल्याचे मी पोनिरी पाटील यांना सांगीतले. त्यामुळे सदर सापळा कारवाई पुढे चालु ठेवणे उचित नसल्याने सर्वानुमते सदरची सापळा कारवाई स्थगित केली. परंतु दिनांक 14/09/2019 रोजी पंचासोबत केलेल्या पडताळणीत माझे मुलाचे नावे असलेला टेम्पो सोडण्याकरीता पोलीस मुंढे यांनी इथे दहा हजार भरुन आता गाडी रिलीज करुन देतो.. इथे दहा हजार भरावे लागेल. असे बोलले तसेच केस कधीच केलीय की, दहा हजार आता भरा गाडी सोडून देतो.. त्याला मंगळवारी कोर्टमिधी पाठवा.. तीन हजार रुपये फाईन लागेल..लायसन्स वगैरे काय सस्पेन्ड होणार नाही.. क्लिअर करुन देतो, नाय तर गाडीची पासींग नाय होणार,उद्याच्याला... असे बोलून माझेकडे 10,000/-रू. (दहा हजार) लाचेची मागणी केलेली आहे. तसेच पोनिरी श्रीमती पाटील यांनी पोलीस मुंढे यांचे नाव पत्याबाबत गोपनियरित्या माहीती मिळविली असता सदर पोलीसाचे नाव अंगद मुरलीधर मुंढे, पोशि/2135 रा. शिवाजीनगर, स्मशानभुमी रोड, बुध्दविहार मागे, गणेशमिलजवळ, चितळसर, मानपाडा, ठाणे पश्चिम यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद संगणकावर टंकलिखीत केली असुन तिची काढलेली प्रिंट मी वाचुन पाहिली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष
हे लिहुन दिले.(सुषमा पाटील)पोलीस निरीक्षक (संजय शंकर म्हसे) अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

**13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): — म.पो.नि पाटील ASB. ठाणे **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे ~~RAVIRAJ BALWANT~~ **Rank (पद):** SI (Sub-Inspector)

**No.(क्र.):** 1234 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

Scanned by CamScanner

14. Signature/Thumb impression of the complainant / informant. (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

S. S. mhetre

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Bmadane

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिकारी सही)
पोलीस ठाणे अंमलदार
Name (नाम): RAVIKANT DIGAMBAR MADEK
Rank(पद): I (Inspector)
गिरीशनगर पोलीस ठाणे
No.(सं.): 1234



Scanned by CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned by CamScanner